| | |
|---|---|
| दाखल दिनांक | : ०९/१२/२०१९ |
| नोंदणी दिनांक | : ११/१२/२०१९ |
| निकाल दिनांक | : ११/११/२०२५ |
| कालावधी | : ५व, ११म, २दि. |

**विशेष न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे यांचे न्यायालयात**
**[पिठासीन अधिकारी - श्रीमती कविता दि. शिरभाते]**

**फॉर्म नं. XXXII**
**[ न्यायनिर्णयाचे शीर्षकपृष्ठ ]**

**भाग – 'अ'**
[क्रिमीनल मॅन्युअल चाप्टर (vi) अनुच्छेद ४४ (i)]

**विशेष (बाल संरक्षण) खटला क्र. ५९०/२०१९** **निशाणी क्र. २६**
*[CNR No. MHPU01-018436-2019]*

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवाल माहिती / गुन्हा आणि पोलीस स्टेशन | गुन्हा क्र. **२९६/२०१९**,<br>पोलीस स्टेशन, बिबवेवाडी, पुणे. |
| अभियोग पक्ष/तक्रारदार/फिर्यादी | **महाराष्ट्र शासन**<br>तर्फे<br>पोलीस निरीक्षक, बिबवेवाडी, पुणे. |
| अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी वकील | **श्रीमती ए. व्ही. भगत.** |
| आरोपी | **ओंकार बाळू जाधव**<br>वय– २१ वर्षे, धंदा– काहीनाही<br>राहणार- सर्व्हे नं. १/३३/३४, अंबिल ओढा कॉलनी, सानेगुरूजी नगर, निलायम थिएटरच्या समोर, सदाशिव पेठ, पुणे. |
| आरोपीतर्फे वकील | **श्री. सी. आर. करंजावणे.** |

**भाग 'ब' ( पॅरा ४४(ii) प्रकरण ६ क्रिमिनल मॅन्युअल )**

| | |
|---|---|
| गुन्हा घडला तारीख | **३०/०३/२०१९ ते ०९/१०/२०१९** |
| प्रथम खबरी अहवाल दिनांक | **०१/१०/२०१९** |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दिनांक | ०९/१२/२०१९ |
| दोषारोप निश्चित दिनांक | ०५/०३/२०२५ |
| पुरावा सुरूवात दिनांक | ०३/११/२०२५ |
| युक्तीवादाचा दिनांक | ११/११/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी राखून ठेवल्याचा दिनांक | — |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ११/११/२०२५ |
| आरोपीच्या शिक्षेबाबतचा दिनांक | लागू नाही. |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | दोषमुक्त केले किंवा शिक्षा सुनावली | शिक्षा काय दिली | अटक झाल्या पासून न्यायनिर्णयापर्यंत आरोपी कारागृहात होते का? असल्यास कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार सुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **ओंकार बाळू जाधव** | १०/१०/२०१९ | १३/१२/२०१९ | भा.दं.वि.कलम ३६३, ३६६, ३७६, ३५४, लैं. गु. बा.सं.का. कलम ४, ८, १२ | **दोषमुक्त केले** | **नाही** | — |

## भाग 'ब' ( पॅरा ४४(iii) प्रकरण ६ क्रिमिनल मॅन्युअल ) ( अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे / न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी )

| अभियोग पक्षातर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
| सा.क्र.१ – नि.क्र. ९ | 'अ' | पिडिता |
| सा.क्र.२ – नि.क्र. २२ | 'ब' | फिर्यादी/पिडितेची आई |

| आरोपीतर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
| — | — | — |

| न्यायालयातर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
| — | — | — |

**( अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे / न्यायालयातर्फे निशाणी दिलेल्यांची यादी )**

**'अ' – अभियोगपक्षातर्फे -**

तोंडी पुराव्याव्यतिरिक्त अभियोग पक्षाने खालील कागदपत्रांकडे न्यायालयाचे लक्ष वेधले -

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | पिडितेचा जन्मदाखला | १० |
| २. | संमतीपत्र | ११ |
| ३. | पिडितेच्या कपडे जप्ती पंचनामा | १३ |
| ४. | पिडितेचा फौ.प्र.सं. कलम १६४ प्रमाणे नोंदवलेला जबाब | १४ |
| ५. | फिर्याद | २३ |

आरोपी पक्षातर्फे खालीलप्रमाणे कागदपत्रे मान्य करण्यात आली-

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | अटक पंचनामा | १५ |
| २. | आरोपीच्या कपडे जप्ती पंचनामा | १६ |
| ३. | होंडा डिओ स्कूटर जप्तीचा पंचनामा | १७ |
| ४. | आरोपीचा लैंगिक सक्षमतेचा अहवाल | १८ |
| ५. | घटनास्थळ पंचनामे | १९, २० |

**‘ब' आरोपीतर्फे -**

| अ.क्र. | कागदपत्राचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| — | — | — |

**‘क' न्यायालयातर्फे -**

| अ.क्र. | कागदपत्राचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| — | — | — |

**‘ड' महत्त्वाचे पुरावे -**

| अ.क्र. | कागदपत्राचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| — | — | — |

***

## न्यायनिर्णय
## ( घोषित दिनांक – ११/११/२०२५ )

१. आरोपीविरूध्द सदरचा खटला हा भारतीय दंड विधान कलम **३६३, ३६६, ३७६, ३५४,** तसेच लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **४, ८, १२** चे अंतर्गत दोषारोप ठेवून चालविण्यात आला. (पिडित मुलगी, तिचे नातेवाईक यांची नांवे आणि त्यांचे राहण्याचे ठिकाण गुप्त राखण्याकरिता न्यायनिर्णयात नमूद केलेले नाही).

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की,**

२. फिर्यादी ही तिचे पती व मुलांसह राहत आहे. तिच्या पतीचे दोन लग्न झालेले असून पिडिता ही तिची सावत्र मुलगी आहे. पिडितेचे इयत्ता १२वी पर्यंत शिक्षण झाले असून ती घरीच राहत होती. दिनांक ३०/०९/२०१९ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता फिर्यादी ही तिची मुलगी रेणूका व पिडिता यांचेसह फळे, भाजी आणण्यासाठी अप्पर डेपो येथील मंडई येथे गेली व भाजीवाल्याकडून भाजी घेत असताना पिडितेने तिला तहान लागल्याचे फिर्यादीला सांगितले. त्यावेळी फिर्यादीने तिला समोरच असलेल्या हॉटेलमधून पाणी पिऊन येण्यास सांगितले. १५ मिनीटे होऊनदेखील पिडिता परत आली नाही म्हणून फिर्यादी व तिची मुलगी रेणूका यांनी समोरील हॉटेलमध्ये जाऊन पिडितेबाबत चौकशी करुन तिचा शोध घेतला असता, ती मिळून आली नाही. त्यानंतर फिर्यादीच्या पतीने पिडितेच्या आईकडे चौकशी केली, परंतु ती घरी आली नसल्याचे तिने सांगितले. त्यानंतर फिर्यादी, तिचे पती, व पिडितेच्या आईने पिडितेचा खूप शोध घेतला, परंतु ती मिळून आली नाही. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशनला जाऊन पिडिता हरविल्याची तक्रार दाखल केली.

३. दिनांक ०९/१०/२०१९ रोजी पिडिता ही आरोपीच्या आईकडे आली व तिने शारीरिक संबंधाच्या घटनेबाबत तिला सविस्तर सांगितले. त्यानंतर पिडिता ही तिचे आई, वडील व मावशी यांचेसोबत पोलीस स्टेशनला गेली व पोलिसांसमोर असा जबाब दिला की, आरोपी व तिचे प्रेमसंबंध असून ती आरोपीसोबत लग्न करणार होती. आरोपीची आई पिडितेला मागणी घालण्यासाठी तिच्या घरी असता पिडितेच्या आई-वडिलांनी पिडितेचा आरोपीबरोबर लग्न लाऊन देण्यास नकार दिला. त्यानंतर दिनांक

१२/०९/२०१९ रोजी पिडिता ही तिची सावत्र आई फिर्यादीकडे राहण्यास आली होती. दिनांक ३०/०९/२०१९ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता पिडिता ही फिर्यादी व तिची सावत्र बहीण रेणूका यांचेसोबत भाजी खरेदी करण्यासाठी मंडईला गेली. त्यावेळी आरोपी तेथेच लांब उभा होता व तिला हाताने इशारा करून त्याच्याकडे बोलावले. त्यानंतर पिडितेने तिला तहान लागली आहे असे फिर्यादीला सांगून समोरच्या हॉटेलकडे गेली असता, आरोपीने तिला त्याच्या डिओ स्कूटरवर बसवून लोणावळा येथे त्याच्या मित्राच्या घरी घेऊन गेला व दिनांक ०१/१०/२०१९ ते ०८/१०/२०१९ या दरम्यान पिडितेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर जबरदस्तीने वारंवार लैंगिक अत्याचार केले. त्यानंतर पिडितेला आई-वडिलांची आठवण येऊन ती रडू लागल्याने आरोपी तिला तिच्या आई-वडिलांकडे सोडतो असे सांगून दिनांक ०८/१०/२०२१ रोजी तिला चैतन्य लॉजिंग अ‍ँड फॅमिली गार्डन येथे आणले व तेथे एक खोली भाडयाने घेऊन तिला खोलीत नेले व तेथेदेखील आरोपीने तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी पुन्हा शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर पिडिता आरोपीच्या आईकडे येऊन घटनेबाबत कळविले असा जबाब दिल्याने पोलिसांनी दिनांक ०९/१०/२०१९ रोजी तिचा रितसर जबाब नोंदवला, तसेच दिनांक १२/१०/२०२१९ रोजी पिडितेने पुरवणी जबाब दिल्याने तोही पोलिसांनी तिच्या सांगण्यानुसार नोंदवून घेतला व आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला. तपासी अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास करुन आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. दिनांक ०५/०३/२०२५ रोजी मी आरोपीविरूध्द दोषारोप (निशाणी क्र.६) निश्चित केले. आरोपीला त्याचेविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोप त्याला समजेल अशा भाषेमध्ये वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबूल करून त्याचेविरूध्द खटला चालवावा असे सांगितले.

५. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द दोषारोप निश्चित केल्यानंतर अभियोग पक्षाने केवळ दोन साक्षीदारांची साक्ष याकामी नोंदवली. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ पिडिता व साक्षीदार क्र.२ फिर्यादी यांनी अभियोग पक्षास सहकार्य न करता फितूर झाले. अभियोग पक्षाने तपासी अंमलदार व इतर महत्त्वाच्या साक्षीदारांना याकामी तपासले नाही व त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपीविरुध्द अभिलेखावर काहीही न आल्याने आरोपीचा

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही.

६. अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी वकील श्रीमती ए. व्ही. भगत आणि आरोपीतर्फे वकील श्री. सी. आर. करंजावणे यांचा युक्तिवाद ऐकला.

७. प्रस्तुत खटल्यातील हकीकतेच्या अनुषंगाने खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसह मी पुढे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने दिनांक ३०/०९/२०१९ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता अप्पर इंदिरा नगर, बिबवेवाडी, पुणे येथून पिडिता वय वर्षे १७ हिला फूस लावून तिच्या कायदेशीर पालकांच्या हवाल्यातून संमतीविना पळवून नेले व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम **३६३** अन्वयेचा अपराध केला..? | **... नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने दिनांक ०१/१०/२०१९ ते दिनांक ०८/१०/२०१९ या कालावधीत, लोणावळा व चैतन्य लॉजिंग अँड फमिली गार्डन, खडकवासला, पुणे येथे पिडितेसोबत शारीरिक संबंध ठेवता येईल या उद्देशाने तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्या इच्छेविरुध्द पळून जाण्यास प्रेरित केले व तिला त्याच्याशी शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडले व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम **३६६** अन्वयेचा अपराध केला..? | **... नकारार्थी.** |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी पिडितेच्या इच्छेविरुध्द तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध ठेवून बलात्काराचा गुन्हा केला व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम **३७६** अन्वयेचा अपराध केला..? | **... नकारार्थी.** |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, | |

| | | |
|---|---|---|
| | आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, पिडितेचा विनयभंग करण्यासाठी फौजदारी बलाचा वापर करून तिचा विनयभंग केला व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम **३५४** अन्वयेचा अपराध केला..? | **... नकारार्थी.** |
| ५. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी अल्पवयीन पिडितेवर लिंगभेदी लैंगिक अत्याचार केले व त्यायोगे आरोपीने लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **३** सह कलम **४** अन्वयेचा अपराध केला? | **... नकारार्थी.** |
| ६. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी अल्पवयीन पिडीतेवर लैंगिक अत्याचार केले व त्यायोगे आरोपीने लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **७** सह कलम ८ अन्वयेचा अपराध केला? | **... नकारार्थी.** |
| ७. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी अल्पवयीन पिडीतेचा लैंगिक छळ केला व त्यायोगे आरोपीने लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **११** सह कलम **१२** अन्वयेचा अपराध केला? | **... नकारार्थी.** |
| ८. | काय आदेश..? | **...सबळ पुराव्याअभावी आरोपीची निर्दोष सुटका करण्यात आली** |

## <u>का र ण मि मां सा</u>

८. अभियोग पक्षाने या प्रकरणी केवळ पिडिता व फिर्यादी यांची साक्ष नोंदविली आहे. पिडितेला साक्षीदार क्र.१ म्हणून, तर फिर्यादीला साक्षीदार क्र.२ म्हणून तपासले आहे.

**<u>मुद्दे क्र.१ ते ७ बाबत -</u>**

९. वर नमूद सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने चर्चेच्या अनुषंगाने त्याची

पुनरावृत्ती टाळण्याकरिता मी मुद्दयांचे कारणमिमांसा एकत्रीतपणे चर्चित आहे.

१०. अभियोग पक्षाने पिडीतेच्या जन्मदाखल्याची मूळ निशाणी क्र. १० अभिलेखावर दाखल केली आहे. साक्षीदार क्र.१ पिडितेने तो दाखला तिचाच असून त्यामध्ये तिची जन्मतारीख २४/०७/२००२ व तिच्या आई-वडिलांची नांवे नमूद असल्याचे कथन केले आहे. सदरची घटना ही दिनांक ३०/०९/२०१९ ते ०८/१०/२०१९ या कालावधीत घडली आहे. यावरून असे दिसून येते की, पहिली घटना घडली त्या दिवशी पिडीता ही १७ वर्षे, २ महिने व ६ दिवसांची होती. पिडीतेच्या वयाबाबत आरोपीच्या वकिलांनी कुठलाही आक्षेप नोंदविला नाही व तिची जन्मतारीख नाकारली नाही. सबब, मी असा निष्कर्ष काढते की, पोक्सो कायद्याच्या तरतुदींनुसार आवश्यकतेनुसार अभियोग पक्षाने पिडीतेचे वय सिद्ध केले आहे व तिचे वय घटनेच्यावेळी १८ वर्षाच्या आतील होते ही बाब सिध्द होत आहे. परंतु असे असले तरी, सदर आरोपीनेच अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून नेऊन तिचा विनयभंग करून तिच्या इच्छेविरुध्द शारीरिक संबंध केले व तिचा लैंगिक छळ केला ही बाब निःसंशयपणे शाबित होणे गरजेचे आहे.

११. **साक्षीदार क्र. १ 'अ' पिडिता** हिने तिच्या पुराव्यात असे कथन केले की, घटनेच्यावेळी ती सावत्र आई, सावत्र भाऊ व बहीण यांचेसोबत राहत होती. तिची जन्मतारीख २४/०७/२००२ अशी आहे. ती आरोपीला ओळखते. दिनांक १२/०९/२०१९ रोजी तिच्या घरचे तिच्या लग्नाला नकार देत असल्यामुळे ती घर सोडून निघून गेली, म्हणून तिच्या घरच्यांनी रागाच्या भरात तक्रार दिली. असे घडले नाही की, दिनांक १२/०९/२०१९ रोजी आरोपीने तिला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेले होते व दिनांक ३०/०९/२०१९ ते ०९/१०/२०१९ पर्यंत तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध केले.

१२. **साक्षीदार क्र.२ 'ब' पिडितेची सावत्र आई/फिर्यादीने** तिच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, ती तीन मुले व पतीसोबत राहते. पिडिता ही तिची सावत्र मुलगी आहे. घटनेच्यावेळी ती तिच्यासोबत राहत होती. तिची जन्मतारीख तिला आठवत नाही. घटनेच्यावेळी ती अंदाजे १७ ते १८ वर्षांची होती. दिनांक ३०/०९/२०१९ रोजी ती एका मुलाबरोबर पळून गेली. त्यानंतर तिने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली. तक्रार निशाणी क्र.२३ मधील मजकूर तिला वाचून दाखवला असता, त्यातील मजकूर तिला

माहित नसल्याचे तिने कथन केले.

१३. साक्षीदार क्र.१ व २ यांनी त्यांच्या साक्षीमध्ये घटनेबाबत काहीही न सांगितल्यामुळे त्यांना फितूर घोषित करून त्यांचा अभियोग पक्षातर्फे उलट तपास घेण्यात आला, परंतु उलट तपासात त्यांनी आरोपीने पिडितेला लग्नाचे आमिष दाखवून फूस लाऊन पळवून नेले व तिचा विनयभंग करुन तिच्या इच्छेविरुध्द तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले व तिचा लैंगिक छळ केला ही बाब नाकारून अभियोग पक्षास साहाय्य केले नाही, त्यामुळे साक्षीदारांच्या उलट तपासातूनही अभियोग पक्षाला आरोपीविरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात पिडिता ही आरोपीला ओळखत असून त्यांच्या लग्नाबाबत घरात चर्चा चालू होती व दिनांक ३०/०९/२०१९ रोजी आरोपीने तिला स्कूटरवर बसवून पळवून नेले या बाबी मान्य करून दिनांक ३०/०९/२०१९ ते ०९/१०/२०१९ या कालावधीत आरोपीने तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले असल्याची बाब अमान्य केली.

१४. अभिलेखावर दाखल कागदपत्रे व पुराव्याचे अवलोकन केले असता मी या निष्कर्षाप्रत आले आहे की, अभियोग पक्ष गुन्हयाचे घटक सर्व वाजवी शंकेपलीकडे सिद्ध करण्यात पूर्णपणे अपयशी ठरला आहे. पिडीता व तिच्या आईची साक्ष विश्वासार्ह नसल्यामुळे आरोपीने सदरचा गुन्हा केला या निष्कर्षाप्रत मी येऊ शकत नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपीविरूध्दचे आरोप सिध्द केलेले नाही या निष्कर्षाप्रत मी आलेले आहे व मी माझे उत्तर मुद्दे क्र.**१ ते ७** ला **'नकारार्थी'** नोंदवित आहे व आरोपी हा सदरहू आरोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे या निष्कर्षाप्रत मी आलेले आहे. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## ***आदेश***

१) आरोपी **ओंकार बाळू जाधव** यास भारतीय दंड विधान कलम **३६३, ३६६, ३७६, ३५४** व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा कलम **४, ८, १२** अन्वयेच्या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २३५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपीने कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये **रुपये ५०,०००/-** (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) चा जामीन व जातमुचलका सहा महिन्याच्या कालावधीकरिता दयावा.

४) जप्त मुद्देमाल म्हणजेच पांढ-या रंगाची होंडा डिओ स्कूटर क्र. एमएच-१२/एनझेड-०३१७ ही फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ४८१/२०१९, दिनांक १६/०१/२०२० रोजीच्या आदेशानुसार यापूर्वीच तिच्या मूळ मालकाच्या ताब्यात देण्यात आली आहे. त्याचा ताबा मूळ मालकाकडेच राहील. तसेच आरोपी व पिडीतेचे जप्त कपडे व बेडशीट मूल्यहिन दर्शविल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर त्याची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

[ न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला ]

Digitally signed by KAVITA DILIP SHIRBHATE
Date: 2025.11.12 17:19:32 +0530

पुणे.
दिनांक - ११/११/२०२५.

**[ कविता दि. शिरभाते ]**
विशेष न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
पुणे

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | **Shri. D. L. Gudde,**<br>Stenographer (Grade-I) |
| Name of the Court | :- | **Smt. Kavita D. Shirbhate**<br>Special Judge &<br>District Judge- 11 &<br>Additional Sessions Judge, Pune. |
| Date of Judgment | :- | 11/11/2025 |
| Judgment checked & signed by presiding officer on | :- | 12/11/2025 |
| Judgment uploaded on | :- | 12/11/2025. |